18/24

FORM-1A

0058166

N.C.R.B.

I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. १८ वर्ष Year २०२४ दिनांक Date ०९/०६/२०२४

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शनिवार तारीख पासून Date from ०८/०६/२०२४ वेळ Time ११.४५ वा तारीख पर्यंत Date to ०९/०६/२०२४ Time ........
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 ✓ (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 ✓ (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०८/०६/२०२४, वेळ Time ........
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०९/०६/२०२४ तारीख Date ........, वेळ Time ........

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. उत्तर ३२ किमी चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name अरिहंत केमीस्ट दुकाना समोरील रस्त्यावर, ठिकाणाचे नंबर No. if any यशकृपा को. सोसायटी गल्ली Ward चिकुवाडी रस्त्याचे नाव Name of road शिंपोली लिंक रोड
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place साईबाबा मंदीर गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka बोरीवली जिल्हा Dist. मुंबई उपनगर, राज्य State महाराष्ट्र.
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name ओमप्रकाश रामनयन उपाध्याय (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रामनयन उपाध्याय
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४२ वर्षे. (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9820751519
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation व्यापार (केमीकल विक्री)
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ब्राम्हण, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address : फ्लॅट नं. १४५ / सर्व्हे Ward नं. ........ / नाव न. House/Name No. सेक्टर नं. ०२ गोराई / मो. नं. Phone/M. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
रस्त्याचे नाव Road बोरीवली (प) जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. बोरीवली पो.ठाणे.
तालुका Taluka बोरीवली जिल्हा Dist. मुंबई उपनगर राज्य State महाराष्ट्र. सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

कुणाल शांताराम संखे पो.शि. क्र. ९८०७९८/बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई रा.ठि. सी/४०७, तुळसी हाईटस्, मनवेलपाडा रोड, डॉन बॉस्को चर्चजवळ, विरार (पुर्व) पालघर.

यातील तक्रारदार नामे ओमप्रकाश रामनयन उपाध्याय वय ४२ वर्षे, रा.ठी. फ्लॅट नं. ९९५, बी/२१, गोराई, सेक्टर नं.२, बोरीवली (प) मुंबई. यांचा दि:-०८/०६/२०२४ रोजी स्वतंत्र पानावर मराठीतून टंकलिखीत केलेला जबाब हाच नमुद गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Gaikwad

(आदिनाथ गायकवाड)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

(Om Prakash R. UPADHYAY)

फिर्याद दिनांक – ०९/०६/२०२४

श्री ओमप्रकाश रामनयन उपाध्याय, वय ४१ वर्षे, धंदा—व्यापार, रा.ठि प्लॉट नं. १९५, बी २१, गोराई सेक्टर नं. २, बोरीवली पश्चिम, मुंबई ९२, मो.क्र. ९८२०७५१५१९.

.....

मी वरील प्रमाणे असून मी वर नमूद पत्यावर १४ वर्षापासून राहत असून माझे सोबत माझी पत्नी सौ निरज वय ४० वर्षे, मुलगी अनिशा वय १८ वर्षे असे राहत आहेत. माझा केमिकल विक्रीचा व्यवसाय रिर्चड कंम्पाउंड,वसई पूर्व या ठिकाणी आहे. माझे व्यवसायातून मिळणारे पैशातून माझे कुंटुबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी सन २००८ रोजी जनसेवा बॅक, चारकोप, कांदिवली पश्चिम, मुंबई या बॅकेतून माझे व्यवसाया करीता माझे रहाते घर गहाण ठेवून ५ लाख रूपये कर्ज घेतले होते. त्यांनतर सन २०११ मध्ये मुंबई मध्यवर्ती बॅकेत सदर कर्ज ट्रान्सफर केले व त्या ठिकाणाहून ११ लाख रूपये वाढीव कर्ज घेतले आणि सदर कर्ज रक्कम मी सन २०१२ मध्ये टाटा कॅपीटल या फायनान्स मध्ये ट्रान्सफर केली तेथून ३५ लाख रूपये वाढीव कर्ज घेतले होते. त्यानंतर सन २०१८ रोजी आय.आय. एफ.एल या फायनान्स कंपनी मध्ये माझे मागील कर्ज रक्कम ट्रान्सफर केली व तेथून मी ४७ लाख रूपये वाढीव कर्ज घेतले होते.

सदर कर्जाचे मी २०२० पर्यत विहीत वेळेत इ.एम.आय ची रु. ६०,३५७/– प्रति महा ही रक्कम नियमित भरणा करीत होतो. परंतू करोना काळामध्ये माझे व्यवसायामध्ये आर्थिक नुकसान झाल्याने मला ५ ते ६ इ.एम.आय वेळेवर भरता आले नाहीत. त्यामुळे मे २०२३ रोजी आय.आय.एफ.एल या फायनान्स कंपनी कडून माझे रहाते घराचे दर्शनी भागावर माझे घर कंपनीचे ताब्यात असलेबाबत नोटीस चिटकावली होती व त्यानंतर मला माझे रहाते घरी निशांत सांगळे अॅड. कोर्ट कमीशनर याची दि ०९/०५/२०२४ रोजीची नोटीस कुरियरने प्राप्त झाली व सदर नोटीस मध्ये अति. मुख्य मेट्रोपॉलीटियन मॅजिस्ट्रेट, १९ वे कोर्ट, एस्प्लांडे, मुंबई यांचे आदेशप्रमाणे, दि ०७/६/२०२४ रोजी माझे घराचा ताबा आय.आय.एफ.एल या फायनान्स कंपनीस देण्याचे नमूद होते सदर नोटीस मिळाल्यानंतर माझे विरोधात आय.आय.एफ.एल फायनान्स कंपनीने अति. मुख्य मेट्रोपॉलीटियन मॅजिस्ट्रेट, १९ वे कोर्ट, एस्प्लांडे, मुंबई या ठिकाणी केस नं ७३५/एस ए/२०२३ ही दिवाणी केस दाखल केली असल्याचे समजले.

त्यांनंतर दि ०५/०६/२०२४ रोजी सायं. ०७:०० वाजेचे दरम्यान बोरीवली पश्चिम पोलीस ठाण्याचे कुणाल संखे नावाचे पोलीस कर्मचारी माझे रहाते घरी आले होते व त्यांनी माझे पत्नीस घराचे ताबा देण्याबाबत माहिती दिली पण त्यावेळी मी घरी नसल्यामुळे कुणाल संखे यांनी सायं ०७:०३ वाजेचे दरम्यान त्याचे मो.क्र ९२७०३०३३८५ या कमांकावरून माझे मो क्र ९८२०७५१५१९ या नंबरवर मीस कॉल केला होता. त्यानंतर मी त्याना सायं. ०७.१० वा. सुमारास दोन कॉल केले परंतू त्याचे कॉल एगेज आले. त्यानतंर त्यांचा सायं. ०७:१३ वा. मला फोन आला त्यावेळी संखे यांनी मला माझे घराचे ताबा देण्याबाबत माहिती दिली व मला पोलीस स्टेशनला गोपनिय कक्षामध्ये बोलावून घेतले. त्यानंतर मी गोपनिय कक्षामध्ये जावून संखे यांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, अॅड. निशांत सांगळे, एक्स्पनेड कोर्ट कमीशनर यांनी पोलीस स्टेशन ला पत्र पाठवून माझे रहाते घराचा ताबा आय.आय.एफ.एल या फायनान्स कंपनीस मिळवून देण्या करीता दि ०७/०६/२०२४ रोजी पोलीस बंदोबस्ताची मागणी केली आहे व त्या करीता मला माझे घर खाली करावे लागेल, असे सांगुन मला निशांत सांगळे यांचे पोलीस स्टेशनला आलेले पत्र दाखविले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, सर ०३ इएमआय पेंडीग साठी घर खाली करावे लागते ही खूप अश्चर्याची गोष्ट आहे. मी ०३ दिवसांमध्ये कसे घर खाली करणार ? मला घर खाली करण्यासाठी वेळी भेटला असता तर बरे झाले असते. त्यावेळी सदर ताबा कारवाई ला ०१ महिना पुढे ढकलायची असल्यास ०१ लाख रू दयावे लागतील असे बोलून संखे यांनी माझेकडे लाचेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना माझे कडे एव्हढे पैसे नसल्याचे सांगितले व त्यांना विचार करून सांगतो असे बोलून पोलीस स्टेशन मधून माझे घरी निघून आलो.

त्यानंतर पोलीस कर्मचारी कुणाल संखे यांनी मला दि ०६/०६/२०२४ रोजी दुपारी ०३:५६ वा माझे मोबाईलवर कॉल करून लाचेचे रक्कमेबाबत विचारणा केली होती. त्यांनतर दुपारी ०४:०७ वा व रात्रौ ०८:१८ वा माझे व्हॉटसअॅप वर मिस कॉल केले होते तसेच मला संखे यांनी प्रोटेक्शन ऑर्डर ची प्रत माझे व्हॉटसअप कमांकावर रात्रौ ०८:२३ वा पाठवली होती. व call me असा मेसेज पाठवला होता. त्यानंतर मी कुणाल संखे यांना रात्रौ ०८:५४ वा कॉल केला होता त्यावेळी संखे यांनी माझे कडे लाचेचे रक्कमेबाबत विचारणा केली होती. तसेच दि ०८/०६/२०२४ रोजी कुणाल संखे यांनी रात्रौ ००:२२ वा आणि ००:५७ वा. माझे मोबाईल मिस कॉल आले असल्याने मी पो. कर्मचारी संखे यांना ००:५८ वा कॉल केला त्यावेळी संखे यांनी पुन्हा माझेकडे लाचे बाबत विचारणा केली. तसेच दि ०८/०६/२०२४ रोजी संखे यांनी मला माझे मोबाईल क्र वर सकाळी ०८:३३ वा कॉल करुन मला दुपारी १३:०० वाजता पोलीस स्टेशन ला बोलावले.

(Omprakash R. Upadhyay)

श्री. ओमप्रकाश रामनयन उपाध्याय, वय ४१ वर्षे यांचा दि. ०९/०६/२०२४ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु...

परंतू मला पो. कर्मचारी संखे याना ०१ लाख रूपये लाच देण्याची इच्छा नसल्यामूळे मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात त्याचे विरोधात तक्रार देण्यासाठी आलो. तेथील पोनि गायकवाड यांनी माझी तक्रार ऐकुन घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पंच हजर झाल्यानंतर पोनि गायकवाड यांनी मला सदर ठिकाणी हजर असलेले सपोआ साळुंखेपाटील, दोन सरकारी पंच व पोलीस पथक यांची ओळख करून दिली. माझा तक्रार अर्ज मी स्वहस्ताक्षरात लिहून त्यावर माझी स्वाक्षरी करुन पोनि गायकवाड यांना दिला. सदरची तक्रार बरोबर असल्याची खात्री झाल्यावर पंचांनी व पोनि गायकवाड यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर मला उर्वरीत पोलीस पथकाची ओळख करुन दिली व मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोनि गायकवाड यांनी मला व पोलीस पथकास दिली.

त्यानंतर पोनि गायकवाड यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गायकवाड हे मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेले तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील नविन मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये पोनि गायकवाड, माझे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर पोनि गायकवाड यांनी मला पंच व इतर संपुर्ण पथकास पडताळणी कारवाई करण्यात येणार असून त्याकरीता आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गायकवाड व सपोआ साळुंखेपाटील, दोन पंच व पडताळणी पथक असे सर्व पडताळणी करीता अँन्टी करप्शन ब्युरो येथून दुपारी १४.४० वा. शासकिय वाहनाने रवाना झालो. त्यानंतर पोनि गायकवाड यांच्या आदेशाने सदरचे शासकीय वाहन वरळी सी लिंक व पश्चिम द्रुतगती मार्ग या मार्गाने कांदिवली पूर्व येथून राजेंद्रनगर पोलीस चौकीच्यामार्गाने कांदिवली पश्चिम कडील कोरा केंद्रा जवळील डावीकडे सुमेर नगर, एस.व्हि. रोड या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला थांबविण्यात सांगितले.

त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी पोहचल्यावर मी माझा फोन तपासला असता कुणाल संखे यांचे पावणे चारच्या सुमारास दोन फोन येवून गेल्याचे मला समजले. सदरबाबत मी पोनि गायकवाड यांना अवगत केले. त्यानंतर सपोआ साळुंखेपाटील व पोनि गायकवाड यांनी मला पडताळणी बाबत सुचना दिल्या व पोनि गायकवाड यांच्या सुचनेनुसार पो.ह. रावराणे यांनी शासकिय वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाच्या आतील बनियानला कोणाला बाहेरुन दिसणार नाही अशा पदधतीने लावला. त्यानंतर मी व पंच क्र. ०१ श्री. हरिभाऊ वाळके असे आम्ही पो. कर्मचारी कुणाल संखे यांनी बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई या कार्यालयात बोलविले असल्याने त्या दिशेने रवाना झालो.

त्यानंतर मी व पंच क्र. १ वाळके बोरीवली पोलीस ठाणे येथे सायं. ०४.२६ वा. पोहचलो असता मी माझे फोन वरुन पोलीस कर्मचारी संखे यांना फोन केला असता त्यांनी मला पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या पाठीमागे असलेल्या गोपनिय कक्षात बोलावले.

त्याठिकाणी मी व पंच क्र. १ गोपनिय कक्षात गेल्यावर पो. कर्मचारी संखे हे बसले होते. त्यांनी मला बँक वाल्याबरोबर बोलने झाले का म्हणून विचारले. तसेच जे ४ लोक आली होती. त्यांना पोलीस उपलब्ध नसल्याचे सांगून परत पाठविल्याची माहीती दिली. त्यानंतर पो. कर्मचारी संखे यांनी मला " २० आप बोले थे ना" असे विचारले. त्यावर मी कितना २० ...उस दिन असे म्हटल्यानंतर पो.कर्मचारी संखे यांनी " हा " असे म्हणाले व त्यांनतर मी त्यांना "साहब २० हजार अभि नही है....."असे बोलल्यावर पो. कर्मचारी संखे माझेवर भडकून "तो आये क्यु हो अभी वो तो बताओ" असे बोलले. त्यावर मी त्यांना " तुमचे फोन आल्यामुळे मी तुम्हाला भेटायला आलो" असे सांगितले. त्यावर ते "मतलब हमारा इस्तेमाल कर लिआ...." " फोकट होता है क्या सब काम....." असे ओरडून मला जाण्यास सांगितले. त्यानंतर पो.कर्मचारी संखे यांनी मला माझे सोबत असलेले पंच क्र. १ हे कोण आहेत असे विचारले असता मी त्यांना " ये दोस्त है...... हमारे कंपनीमे काम करेंगे....." असे मी त्यांना सांगितले. त्यानंतर पो. कर्मचारी संखे यांनी मी माझे सोबत लाचेचे रक्कमेबाबत बोलणे करून आज दस करो ...कल दस करो असे म्हणाले आणि ०१ तासामध्ये मला १० हजार रूपये घेवून येण्यास सांगितले.

त्यानंतर मी व पंच क्र. १ असे आम्ही पोलीस पथक असलेल्या ठिकाणी परत आलो. त्या ठिकाणी पो.ह. रावराणे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर पोनि गायकवाड यांनी पो. कर्मचारी संखे यांचेशी झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. तसेच सपोआ साळुंखेपाटील व पोनि गायकवाड यांनी पो. कर्मचारी संखे व माझेमध्ये झालेले संभाषण ऐकले व त्यांना माझेकडे पैशाची मागणी केल्याची खात्री

श्री. ओमप्रकाश रामनयन उपाध्याय, वय ४१ वर्षे यांचा दि. ०९/०६/२०२४ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु...

झाल्याने व मला पुन्हा एका तासात बोलाविले असल्याने पोनि गायकवाड यांनी पो. कर्मचारी संखे यांचेवर पुढील सापळा पुर्व व सापळा कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

त्यांनतर पोनि गायकवाड यांनी माझेकडे पोलीस कर्मचारी संखे यांना देण्याकरीता आणलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझे जवळ असलेली बचतीतील रोख रक्कम रू. १०,०००/— ( ५०० रूपये चे २०नोटा ) पोनि गायकवाड यांच्याकडे दिली. त्यावेळी पो.नि.गायकवाड यांनी त्याचे कडील मोबाईलने सदर नोटांचा फोटो काढले. त्यानंतर पोनि गायकवाड यांच्या आदेशान्वये पो.ह.चा.क्र. ९६१७८६/मोकल यांनी त्यांचेकडील अॅन्थ्रासिन पावडर दाखवून मला, दोन पंच व इतर सापळा पथकातील कर्मचारी यांना अॅन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देवून सापळा कारवाईबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी मी दिलेल्या १०,०००/— रकमेला अॅन्थ्रासिन पावडर लावून सदरच्या नोटा चालक मोकल यांनी माझे शर्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवल्या. दरम्यानच्या काळात माझ्या मोबाईलवर पो. कर्मचारी संखे यांचे दोन फोन येवून गेले असल्याने मी त्यांना सायं. ६.१९ वा. परत माझे मोबाईल वरुन फोन केला असता त्यांनी मला कमल मेडीकल स्टोअर्स, चिकूवाडी, सिंम्फोली यांठिकाणी येण्यास सांगितले. सदरचा फोन करत असताना पोनि गायकवाड यांच्या सांगण्याप्रमाणे शासकिय वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून सदरचा फोन कॉल रेकॉर्ड करण्यात आला.

त्यानंतर मी व पंच क्र. १ कमल मेडीकल स्टोअर्स, चिकूवाडी, सिंम्फोली यांठिकाणी पोहचलो असता पो.कर्मचारी संखे हे कमल मेडीकल च्या समोरच्या बाजुला अरिहंत केमिस्ट च्या जवळील रस्त्याचे बाजूला सफेद रंगाची मोटार सायकल वर बसले होते. मी व पंच क्र. १ हे पो. कर्मचारी संखे असणाऱ्या ठिकाणी गेलो असता त्यांनी मला माझे घराचे ताबा हा माझा आणि आय.आय.एफ.एल कंपनीचा विषय असल्याचे सांगून " हा... वो बॅक का आप संभाल लो... बाकी पोलीस... बॅकवाले आयेंगे तभी पोलीस आयेंगे... नही तो पोलीस आयेंगे नही... इसलिये बॅक के टच मे रेहना... बॅक को बोलना की मुझे थोडा मुदत दो... दो तीन महिने का... बाकी हमारा कुछ इश्यु नही रहेगा... मै संभाल लेता हु..." असे म्हणाले आणि मला माझे कडील लाचेची रक्कम रू १०,०००/— संखे याचे सोबत असणारे गाडीचे डिक्की मध्ये ठेवायला सांगितली . त्याप्रमाणे मी सदर लाचेची रक्कम गाडीचे डिक्की मध्ये ठेवली.त्यानंतर संखे यांनी मला उर्वरीत लाचेची १०,०००/— रू ही रक्कम २ ते ०३ दिवसांमध्ये दे असे सांगितले. त्याचवेळी अगोदर ठरलेल्या इशारे प्रमाणे मी माझे डोळयावरील चष्मा काढला व आजूबाजुला असणारे पो.नि गायकवाड व पथकाने त्यांना व त्यांच्या मोटर सायकलच्या डिक्कीमध्ये ठेवलेल्या लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले.

लोकसेवक श्री. कुणाल शांताराम संखे, पोलीस शिपाई क्र. ०९.०१९२, बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई यांनी अति. मुख्य मेट्रोपॉलीटियन मॅजिस्ट्रेट, १९ वे कोर्ट, एस्प्लांडे, मुंबई यांचे आदेशप्रमाणे, आय.आय.एफ.एल या फायनान्स कंपनीस माझे घराचा ताबा देण्याच्या कारवाईला ०१ महिना पुढे ढकलायची असल्यास ०१ लाख रू दयावे लागतील असे बोलून पो. शिपाई संखे यांनी माझेकडे १ लाख रुपये लाचेची मागणी करुन पडताळणी कारवाई दरम्यान पो. शिपाई श्री. कुणाल संखे यांनी तडजोडीअंती रु. २०,०००/— हजार इतकी लाचेची रक्कम घेण्याचे मान्य करुन पहिला हफ्ता म्हणून रु. १०,०००/— एव्हढी रक्कम स्वीकारल्यानंतर त्याना सदर लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले, म्हणून माझी त्यांच्या विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक श्री. कुणाल संखे यांचे बरोबर कोणतेही देवान घेवान चे व्यवहार नाहीत किंवा कोणतेही पुर्ववैमनस्य नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचून व हिंदीतून समजावून सांगितली असता, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

Gaikwad

( अविनाश गायकवाड )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

(Om Prakash R. Upadhyay)

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.............................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ..............................................

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कांगद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील तक्रारदार यांनी त्यांचे व्यवसायाकरीता आयआयएफएल कंपनीकडून स्वतःचे राहते घर गहाण ठेवून कर्ज घेतले होते. सदर कर्जाचे तीन ईएमआय प्रलंबीत असल्याने, आयआयएफएल कंपनीने १९ वे एम एम कोर्ट, एस्प्लनेड कोर्ट, मुंबई येथे दावा दाखल केला होता. मा. न्यायालयाचे आदेशाने एस्प्लनेड कोर्ट कमीशनर यांनी बोरिवली पोलीस स्टेशन यांना तक्रारदार यांचे घराचा ताबा घेण्याकरीता पोलीस बंदोबस्ताची मागणी केली होती. त्यावेळी यातील लोकसेवकाने दि: ०५/०६/२०२४ रोजी तक्रारदार यांचे घरी जावून तक्रारदार यांना पोलीस स्टेशन येथे बोलावून घेतले. आणि सदर जप्ती कारवाई एक महिना पुढे ढकलण्याकरीता रु. १,००,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कार्यालयात दि- ०८/०६/२०२४ रोजी तक्रारअर्ज केला. (क्र.मा.प.)

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री अविनाश गायकवाड, पोलीस निरीक्षक.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.............................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......................., जिल्हा .................., राज्य ..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................... (3) Transferred to P. S. ..........................................

District.................................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer-in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अविनाश गायकवाड
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..............................
Posting
Code No. of I. O. ..............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

१२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दि. ०८/०६/२०२४ रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक यांनी नडगोडीअंती तक्रारदार यांचेकडे रु. २०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी करून, पहीला हप्ता म्हणून रु. १०,०००/- लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने, दि. ०८/०६/२०२४ रोजीच्या सापळापुर्व/सापळा आयोजित केलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री कुणाल शांताराम संखे पो.शि.क्र. ०९०७९९२, बोरिवली पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडून रु. १०,०००/- अशाप्रकारे लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. म्हणुन त्यांचेविरुद्ध भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.